अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/प्र-४/ २७८५
दिनांक :-०६/०७/२०२०.

## -: <u>कार्यालयीन परिपत्रक</u>:-

विषय :- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील "विविध संवर्ग" पदावरील सेवकांची सेवाज्येष्ठता यादी अद्ययावत करणेबाबत.

संदर्भ :- १) अति. महापालिका आयुक्त (इ) कार्यालय, जा.क्र.अतिमआ(इ)/साप्र/१६५७ दि.१०/०६/२०१९.
२) अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, जा.क्र.अतिमआ(इ)/साप्रवि/आस्था/प्र-४/१५२५ दि. १२/०६/२०१९.
३) महापालिका आयुक्त कार्यालय, जा.क्र. मआ/साप्र/आस्था/प्र-७/९९३८, दि.०८/०२/२०१९.
४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/ प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११
५) मा. अति. महापालिका आयुक्त (ज), ठराव क्र. ७/७३० दि. ०६ /०७/२०२०.

संदर्भ क्र. १ चे आदेशातील निर्देश विचारात घेऊन पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील "विविध संवर्ग" पदांवरील सेवकांची दि.३१/१२/२०१९ अखेर प्रारूप सेवाज्येष्ठता यादी अद्ययावत करणेसाठी प्रसृत करून अंतिम करावयाची आहे. त्यानुषंगाने खालील प्रमाणे सूचित करण्यात येत आहे,

१) पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील पदांवरील सेवकांची दि.३१/१२/२०१८ अखेर सेवाज्येष्ठता यादी संदर्भ क्र. २ अन्वये अंतिम प्रसिद्ध केलेली आहे. दि.३१/१२/२०१८ अखेर सेवकांच्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीस मा. अति. महापालिका आयुक्त (इ) यांची ठराव क्र.१/१२० दि.१२/०६/२०१९ अन्वये मंजूरी मिळालेली आहे.

२) संदर्भ क्र. ४ अन्वये मे. शासनाने दिलेले निर्देशानुसार आधीच्या वर्षी प्रसिद्ध झालेली अंतिम (final) ज्येष्ठतासूची पुढील वर्षी पुन्हा नव्याने तात्पुरती (provisional) ज्येष्ठतासूची तयार करताना विचारात घेतलेली नसल्याने प्रसिद्ध केलेली नाही. केवळ त्यानंतरचे वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा, वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली तात्पुरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची प्रसिद्ध केलेली आहे.

३) संदर्भ क्र. ३ अन्वये पुणे महानगरपालिका हद्दीत लगतचे ११ ग्रामपंचायतींचे पुणे महानगरपालिकेत समावेशन केलेले आहे. "चालक (जेसीबी) (जेसीबी ऑपरेटर)" या पदावर ग्रामपंचायतीकडील सेवकाची नियुक्ती केलेली आहे. त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.